Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education,
Kolhapur DivisionalBoard, Kolhapur-416004
**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर - ४१६००४.**

Phones : Chairman 2690829 Secretary 2691405 PBX-2696101,2696102,2696103
E-Mail: divsec.kop@gmail.com Web : sscboardkolhapur.in

**कालमर्यादित / महत्वाचे**
सार्वजनिक परीक्षा - प्रथम प्राधान्य

क्र. कोविमं / डीपी / 2596
दिनांक ०४.०२.२०२२

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परीषद,
सातारा / सांगली / कोल्हापूर

**विषय:** उच्च माध्यमिक (इ. १२ वी) व **माध्यमिक शालान्त** (इ.१० वी) प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु/मार्च २०२२ परीक्षा नियोजनाबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, फेब्रु/मार्च २०२२ उच्च माध्यमिक (इ. १२ वी) व माध्यमिक शालान्त (इ.१० वी) प्रमाणपत्र परीक्षेसाठी शाळा तिथे केंद्र या अनुषंगाने खालील मुद्दयांची माहिती घेवून आपल्या अखत्यारितील सर्व उपशिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी यांच्यासमवेत **बुधवार दिनांक ०९ / ०२ / २०२२** रोजी सकाळी ११.०० वाजता मंडळ कार्यालयात उपस्थित रहावे.

१. शाळा तिथे केंद्र या अनुषंगाने इ. १० वी व इ. १२ वी परीक्षेसाठी प्रत्येक शाळेची भौतिक सुविधा, वर्गखोल्या, बेंच, लाईट, पाणी, फॅन इ. उपलब्धतेची माहिती आणावी.
२. इ. १० वी व इ. १२ वी परीक्षेसाठीच्या मुख्य केंद्राअतंर्गत असणाऱ्या प्रत्येक शाळेच्या मुख्याध्यापकांची नांवे, शाळेचा फोन नंबर, मुख्याध्यापक मोबाईल नंबर, ई-मेल आयडी इ. माहिती आणावी. लगतच्या ०३ महिन्यात निवृत्त होत असलेल्या मुख्याध्यापकांची नांवे घेवू नयेत.
३. इ. १० वी इ. १२ वी वर्गाचा १५ च्या आत पट असणाऱ्या शाळांची माहिती.
४. शाळा तिथे केंद्र या अनुषंगाने प्रत्येक शाळातील पेपर ने-आण करणेसाठी सहा.कस्टोडियन (रनर) म्हणून जबाबदार शिक्षक / लिपिक यांची नांवे व मोबाईल नंबर आणावे. ज्या शाळेमध्ये कमी पटामुळे केंद्र नसेल अशा शाळेतील शिक्षकांची नांवेदेखील आणावीत. लगतच्या ०३ महिन्यात निवृत्त होत असलेल्या शिक्षकांची नांवे घेवू नयेत.ज्यांचे पाल्य परीक्षेस प्रविष्ठ होणार आहेत अशा शिक्षकांची नावे पाठवू नयेत.
५. सर्व मुख्याध्यापक/प्राचार्य यांची परीक्षा संचालनाबाबत झुम ॲपद्वारे मिटींग घ्यावयाची असलेमुळे सोबतची माहिती अचुक घेणेत यावी.

सोबत : नमुना हमीपत्र

**विभागीय सचिवांकरिता,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव :

१) शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर - आपणा मार्फत शिक्षणाधिकारी (माध्य) यांना उपरोक्त माहिती विनाविलंब तयार करुन मंडळ कार्यालयात विहित दिनांकास उपस्थित राहणेबाबत आदेश निर्गमित करण्यात यावेत.
२) मुख्याध्यापक/प्राचार्य यांना कळविण्यात येते की, वरील माहिती सोबत जोडलेले हमीपत्र आणि ' रनर 'बाबतची माहिती तातडीने शिक्षणाधिकारी (माध्य) यांचेकडे प्रथम प्राधान्याने देणेत यावे.त्याची एक प्रत आपल्या मुख्य केंद्रप्रमुखांकडे देणेत यावे.

# हमीपत्र

मी, मुख्याध्यापक/प्राचार्य श्री./श्रीम. ---------------------------------------------------- ------------------शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाचे नांव ------------------------------------------------ ---------------------------असे हमीपत्र देतो की, या शाळा / कनिष्ठ महाविद्यालयामध्ये इ. १० / १२ वी परीक्षा २०२२ साठी ------------ विद्यार्थी प्रविष्ठ होणार असून ०१ खोलीमध्ये २५ विद्यार्थी संख्येनुसार ---------- विद्यार्थी संख्येनुसार वर्गखोल्या, ---------- बेंच, सर्व खोल्यामध्ये लाईट, फॅन व पिण्याच्या पाण्याची सोय इ.सुविधा उपलब्ध आहेत. त्यामुळे माझ्या शाळेत इयत्ता १० वी १२वी परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्याची मी हमी देत आहे.

**शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाची माहिती खालीलप्रमाणे.**

| | | |
|---|---|---|
| **मुख्य परीक्षा केंद्राचे नांव व क्रमांक** | : | |
| **मुख्याध्यापक / प्राचार्य नांव** | : | |
| **सांकेतांक क्रमांक** | : | |
| **शाळा / क. महा. दूरध्वनी क्रमांक** | : | |
| **मुख्याध्यापक / प्राचार्य मोबाईल क्रमांक** | : | |
| **मुख्याध्यापक / प्राचार्य ई-मेल आयडी** | : | |

**मुख्याध्यापक/प्राचार्य**
**स्वाक्षरी व शिक्का**

**शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाचे नांव :**

**सांकेतांक क्रमांक :**

प्रति,

मा. विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर

विषय : सहा. परिरक्षक (रनर) यांची नांवे कळविलेबाबत.

महोदय,

मार्च - एप्रिल २०२२ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालान्त व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेसाठी या शाळेचे / कनिष्ठ महाविद्यालयाकडील सह शिक्षक / लिपिक यांची माहिती खालील प्रमाणे देत आहोत.

| **अ.क्र.** | **सह शिक्षक / लिपिक नांव** | **पदनाम** | **सेवेचा कालावधी** | **मोबाईल क्रमांक** | **स्वाक्षरी** |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

**मुख्याध्यापक स्वाक्षरी व शिक्का**